**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड**
**धर्मादाय विभाग,**
**जा.क्रं.2018/धर्मादाय/गुरुव्दारा बोर्ड निवडणूक/सिआर-12,**
**दि.22/11/2018**

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई अधिसूचना
क्रमांक:- जीयुआर-2018/प्र.क्र.67/ज-7 (अ), दिनांक 27 जून 2018
2. नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब बोर्ड अधिनियम 1956 चे नियम 11
3. नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्य निवडणुक 2018 साठी या कार्यालयाचे समक्रमांकीत मतदार यादी कार्यक्रम दि.03/07/2018
4. नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्य निवडणुक 2018 साठी प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीबाबत या कार्यालयाची अधिसूचना दि.25/08/2018
5. अंतिम मतदार यादी प्रसिध्दीच्या दिनांकात बदल करणेबाबत या कार्यालयाचे समक्रमांकीत शुध्दीपत्रक दि.25/10/2018

## अधिसूचना..

नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब बोर्ड अधिनियम 1956 च्या कलम 6 (1) (ii) मधील तरतुदीप्रमाणे नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्यांना निवडून देण्यासाठी घ्यावयाच्या निवडणूकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप मतदार यादी या कार्यालयाचे संदर्भात नमूद अधिसूचने अन्वये दि.27 ऑगस्ट 2018 रोजी मतदार क्षेत्र औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड, बीड लातूर, हे संपुर्ण जिल्हे व चंद्रपुर जिल्ह्यातील राजूरा, कोरपना व जीवती हे तालुके (तत्कालीन हैद्राबाद निजाम संस्थानाचा महाराष्ट्रातील भाग) येथे प्रसिध्द करुन दिनांक 28/08/2018 ते दिनांक 26/9/2018 कालावधीत प्रारुप मतदार यादीवर हरकती व दावे स्विकारण्यात आले.

प्रारुप मतदार यादीवर प्राप्त आक्षेपांवर सुनावण्या घेण्यात आल्या. **नांदेड** जिल्ह्यातील **नांदेड** तालुक्यातील (01) एक मतदाराच्या नांवात दुरुस्ती करुन अंतिम मतदार यादीत नांव समाविष्ट करण्यात आले. नांदेड तालुक्यातील (01) मतदाराचे नांव वगळण्यात आले तसेच (1) तहसिलदार, नांदेड यांच्या अहवालानुसार नांदेड तालुक्याच्या प्रारुप मतदार यादीत मुदखेड तालुक्यातील विधानसभा मतदारसंघातील ज्या मतदारांच्या नांवांचा समावेश झालेला आहे अशा (09) नऊ मतदारांची नांवे मुदखेड तालुक्याच्या अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली. (2) नांदेड तालुक्यातील 52 मतदारांच्या नांवाशी संबंधीत विधानसभा मतदारसंघाचे क्रमांक दुरुस्ती, यादी भाग क्रमांक यातील दुरुस्ती, नांवातील दुरुस्ती करुन नांवे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली. (3) नांदेड तालुक्यातील ज्या व्यक्तींनी मतदार नोंदणी अर्ज (फॉर्म 1) भरुन दिलेला होता परंतू प्रारुप मतदार यादीत ज्यांची नांवे समाविष्ट झालेली नव्हती अशा (37) मतदारांची नांवे अंतिम मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात आली. तसेच (4) तहसिलदार, नांदेड यांच्या अहवालानुसार नांदेड जिल्ह्यातील नांदेड तालुक्यातील प्रारुप मतदार यादीत दुबार नांवे असलेले / एक पेक्षा जास्त नांवे असलेले (2352) दोन हजार तीनशे बावन्न मतदारांची नांवे अंतिम मतदार यादीतून वगळण्यात आली.

तहसिलदार, मुदखेड यांच्या अहवालानुसार **नांदेड** जिल्ह्यातील **मुदखेड** तालुक्यातील (**03**) **तीन** मतदारांनी मतदार नोंदणी अर्ज (फॉर्म 1) भरलेले आहेत, परंतू प्रारुप मतदार यादीत ज्यांची नांवे समाविष्ट झालेली नव्हती अशा (03) तीन मतदारांची नांवे अंतिम मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात आली.

तहसिलदार, माजलगांव यांच्या अहवालानुसार **बीड** जिल्ह्यातील **माजलगांव** तालुक्यातील (01) एक मतदाराच्या नांवात दुरुस्ती करुन अंतिम मतदार यादीत नांव समाविष्ट करण्यात आले. तहसिलदार, मंठा यांच्या अहवालानुसार **जालना** जिल्ह्यातील **मंठा** तालुक्यातील (**03**) **तीन** मतदारांनी मतदार नोंदणी अर्ज (फॉर्म 1) भरलेले आहेत, परंतू प्रारुप मतदार यादीत ज्यांची नांवे समाविष्ट झालेली नव्हती अशा (03) तीन मतदारांची नांवे अंतिम मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात आली. प्रारुप मतदार यादीवरील प्राप्त आक्षेप अर्जावर सुनावणी घेवून, **जालना** जिल्ह्यातील **मंठा** तालुक्यातील प्रारुप मतदार यादीतील (07) मतदारांची नांवे अंतिम मतदार यादीतून वगळण्यात आली.

उक्त निवडणूकीच्या नियम 10 नुसार मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचेकडे दिनांक 05 ऑक्टोबर 2018 ते दिनांक 19 ऑक्टोबर 2018 या कालावधीत निम्नस्वाक्षरीतांनी दिलेल्या दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द अपील दाखल करण्याची मुदत देण्यात आली होती. विहीत कालावधीत मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचेकडे एक अपील अर्ज दाखल झाला. सदरील अपिल अर्जाच्या अनुषंगाने मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी दि.26/10/2018 रोजी या कार्यालयाचे आदेश कायम ठेवण्याबाबत आदेश पारीत केले.

म्हणून मी अरुण डोंगरे (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी, नांदेड उक्त बोर्डाच्या निवडणूक नियम (11) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्यांच्या निवडणूकीसाठी **दिनांक 22 नोव्हेंबर 2018 रोजी** अंतिम मतदार यादी उपरोक्त मतदार क्षेत्रातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालये व गुरुव्दारा सचखंड बोर्ड, नांदेड च्या सुचना फलकावर डकवून प्रसिध्द करीत आहे.

याखेरीज उपरोक्त जिल्ह्यातील सर्व संबंधित तहसिल कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर त्या त्या तालुक्याची अंतिम मतदार यादीची प्रत डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच अंतिम मतदार यादी व सदरील अधिसूचना नांदेड जिल्ह्याच्या संकेतस्थळावर (वेब साईटवर) पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

**मतदार नोंदणी अधिकारी,**
नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर
अपचलनगर साहिब मंडळ निवडणूक 2018
तथा
**जिल्हाधिकारी, नांदेड**